Turkish Online Journal of Qualitative Inquiry (TOJQI)
Volume 12, Issue 8, July 2021: 14337 - 14342

# Discourses of Rashtrasantha Tukadoji Maharaj : A Philosophical Branch

**Dr. Pravin Karnjkar**

Shri saibaba blokprabodhan Arts college ,wadner

Ta-Hinganghat ,Dist- Wardha ,[ Maharashtra ]

Rashtrasant Tukadoji Maharanja was influenced by Indian ideology. Tukadoji Maharaj in his discourses repeatedly shows how important the idea of religion, which has been ruling India for thousands of years, Indian folklore and religion are considered to be two inseparable elements.Because religion is an element that pervades all spheres of life here. Therefore, it is impossible to distinguish between religion and life, he says. Rashtrasant has also accepted the concept of religion as accepted by the traditional Indian theology.At the same time, he says, some of the ideas and principles behind launching festivals in the field of religion were to unite people and give them a new direction.The thread that binds all these philosophies together is religion. Yes, religion is the right behaviour of human beings towards other human beings. While considering the philosophical side of his theology, this philosophical side is the culmination of the festival celebrations of the philosophical thoughts expressed in Vedas, Upanishads, Gita, which he has elaborated in his discourses on the role of the festival and its relation to human life. These discourses of Rashtrasant were for the common man. Therefore, they have shown the true nature of religion in simple language that they can understand. What is special about the philosophical thought of the Rashtrasant is that he put the traditional principles in the modern language in front of everyone and made everyone aware of its eternal values.

प्रस्तावणा

ग्रामगीतेचे रचियते राष्ट्रसंतधर्मभाष्यकारही होते. हे धर्मभाष्य त्यांनी समाजाच्या संदर्भात केलेले होते त्यांच्या रचनांमधुन आपल्याला प्राचीन धर्मशास्त्रातील संकल्पाना व विचारांचा प्रवाह सतत प्रवाहीत झालेला दिसता. अशा या धर्म भाष्यकार तुकडोजींचा जन्म अमरावती जिल्हयातील सावली या गावी “इ.स. १९०९”(१)मध्ये झाला त्यांचे बालपण गरीबीत गेले असले तरी पुढे प्रधानमंत्री,राष्ट्रपती पासुन त्यांच्या भेटीला आलेले दिसतात. फारसे शिक्षण नझालेल्या तुकडोजी महारांजाच्या रचनेत वेद,उपनिषद गीता या ग्रंथातील तत्वे प्रकट झालेली दिसतात त्यांचा ग्रामगीता हा ग्रंथ म्हणजे “आपल्या लोकसमाजाची परंपरागत धर्म दृष्टी आणि आधुनिक लोकशाहिचे तत्वज्ञान”(२)असे म्हटले जाते त्यांच्या चरित्रा तून ही त्यांनी केलेल्या अध्यापनाचा परिचय होते या बाबत “राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे महाराष्ट्रातील साहित्यिक संताच्या प्रभावातील आधुनिक काळातले फार मोठे विभूतीमत्व आहे”(३)असा उल्लेख सापडतो राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची प्रवचणे त्यावेळी अनेक गावात झाली त्यावर आधारीत प्रकशीत झालेल्या पुस्तकावरून राष्ट्रसंताच्यावर असणारा धर्मशास्त्रातील तत्वज्ञानाचा प्रभाव येथे मांडलेला आहे. भारतीय धर्मशास्त्रात आत्मा,कर्म फळसिध्दात,धर्म,पुनर्जन्म,सण उत्सव या मागे कोणत्या काळी आहेत सोबतच धर्मक्षेत्रात दांभिक्ताचा कशी आहे यावर राष्ट्रसंतानी मांडलेल्या विचारांचा परिचय येथे करून देण्यात आलेला आहे.

धर्मविचार -

धर्माचे मानवी जीवनातील महत्वतुकडोजी महाराजांना मोलाचे वाटते. धर्मा मुळेच मानवी जीवन प्राणी जीवनापेक्षा वेगळे आहे. त्यात सामाजीकता,नैतिकता,दया,क्षमा,शांतीकरूणा,इत्यादी गुणांचा विकास होण्यास धर्मच कारणीभूत ठरला असा त्याचा विश्वास आहे. सामाजिक व्यवस्थेत धर्माचे कार्य काय हे सांगतांना आपल्या एका

प्रवचनात ते म्हणतात. “समाजात सुव्यवस्था प्रस्थापित करने आणि परस्पर सहकार्याची व सहानुभुतीची भावना प्रस्तुत करने हे धर्माचे एकमेव कार्य आहे.”(४)यावरूनही सामाजीक जीवनासाठी धर्म काही महत्वपूर्ण आहे ही स्पष्ट होतांना दिसून येते.

आपल्याला आपल्या देशाचे विकास करावयाचा असेल तर त्यातून धर्म वगळताच येणार नाही हे त्यांनी ओळखले होते. हेच सांगतांना ते म्हणतात,म्हणजे माणसाच्या कणाकणात मुरलेली धार्मिकता या ठीकाणी धर्माचे अधिष्ठाण स्वीकरल्या शिवाय कोणतीही गोष्ट करता येत नाही.”(५)येथेही धर्म भारतीय लोकजीवनात किती मुरलेला आहे ही गोष्ट लक्षात येते याच कारणात त्यांनी धर्माला येथील लोकजीवनात महत्वपूर्ण मानलेले दिसून येते. शेवटी हा धर्म काय,व त्याचा हेतू काय हे सांगतांना प्रवचनात ते म्हणतात,“एक माणसाने दुसÚया माणसाचे शोषण करू नये. संर्वानी सहकार्याने व अविरोधान जगावे याचेच नाव धर्म. “धर्म म्हणजे सामाजिक नियमाचे पालन आम्ही जगू तुम्हीही जगा या वृत्तीचे नाव धर्म” (६)अशा सुलभ शब्दात त्यांनी धर्म म्हणजे काय हे सांगुन शेवटी धर्म हा भारतीयांच्या जीवीताचा अविभाज्य असू कसा आहे हे स्पष्ट केलेले दिसून येते.

आत्मविचार

आत्मविचार किवा आत्मयाची संकल्पणा हा भारतीय धर्म विचारांतील महत्वाचा भाग आहे. भगवद्गीतेत आत्म्याचा महिमा वर्णन केलेला आहे. शरीर हे बाहय आवरणा साखे तर आत्मा हा त्यातील चैतन्यशक्ती असतो असे मानले जात राष्ट्संत तुकडोजी महाराजांनी हा आत्मविचार भारतीय धर्मशास्त्रात जसा होता तसाच स्वीकरलेला आहे.

प्रत्येक सजीवात ही आत्मशक्ती असते या आत्मशक्तीच्या बळावरच मनुष्य मुक्तीप्रत पोहचत असतो. केवळ दोषांचे आवरण चढल्याने मनुष्याला या आत्मशक्तीचा बोध होत नाही असे मानले जाते. तुकडोजी महाराज आपल्या प्रवचनांत हेच सांगतात “आत्म्यावर अज्ञान भासक्ती,विषयवासना इत्यादीची आवरणे चढलेली असतात. त्यामुळे त्याचे मुळ स्वरूप अप्रपट राहुन त्यांचे आंकुचितपणच आपल्या नजरेस पडते.”(७)असे ते म्हणतात आपली गुरूदेव संकल्पणा स्पष्ट करतांना ही तुकडोजीनी आत्म्याची संकल्पणा योललेली दिसते. “ज्याचा आत्मानुभव सर्व प्रकारच्या पुस्तकी अनुभवाच्या पलिकडचा आहे व्यापक आहे अशा आत्मज्ञान परिपूर्ण पुरुषाला आम्ही गुरूदेव समजतो.“(८)असे ते म्हणतात येथे आपल्याला तुकडोजी महाराजानं पारंपरिक धर्म विचारांतील आत्मविचार मान्य होता हे ध्यानात घ्यावे लागते आत्म विचार किंवा आत्म्याची संकल्पणा अशा प्रकारे राष्ट्रसंतांच्या धर्मतत्वज्ञान एक संकल्पणा होती हे स्पष्ट होते.

कर्मफल सिध्दांत

कर्मफलाचा सिध्दांत भारतीय धर्मशास्त्रात सजलेला आहे. त्याला धर्म व तत्वज्ञानाचा भक्कम पाया लाभला आहे या सिध्दांता नुसार मनुष्याचे जसे कर्म असतात तसे फळ त्यांना प्राप्त होत असते. चांगले कर्म असेल तर चांगले फल प्राप्त होते. कर्म प्रकार जर वाईट असेल तर त्याचे दुष्परिणामही मानसाला भोगणे क्रमप्राप्त असते कर्मफलाच्या या सिध्दांता मुळे मनुष्य कोणतेही वाईट कर्म करावयाच्या आधी त्या पासुन प्राप्त होणारे दुःख क्लेश याताना यांचा विचार मनात आनुन अशा कर्मापासुन दूर राहण्याचा प्रयत्न करतो.

कर्मफलाचा हाच विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रवचनातुन प्रकट झालेला दिसतो. आपल्या एका प्रवचणांत महाराज कर्म फल बाबत बोलतांना म्हणतात,“या जन्मात जी काही बरी वाईट कर्मे आमच्या हातून होतील तीच आमची संचित संपत्ती ठरेल तिची सोबत होवुन पुढचा मार्ग आम्हाला आक्रमावा लागेल. अशा प्रकारच्या पुनर्जन्मवादावर धर्मा-धर्माचे मतभेद आहेत. पंरतू कर्मानुसार फलप्राप्ती होते यावर सर्व धर्मांचा विश्वास आहे.”(९)येथे आपल्याला राष्तासंताना कर्मफलाचा सिंध्दात मान्य दिसतो. मनुष्याने इहजन्मी केलेले बरे वाईट कर्म पुढच्या जन्मात फलप्राप्तीच्या रूपाने प्रकटते व मनुष्याला सुख दुःख दायक ठरते हा धर्मशास्त्रात सांगीतलेला विचार येथे तुकडोजी महाराजांनी स्वीकारलेला दिसतो राष्ट्रसंतांच्या धार्मिक तत्वज्ञानावर अशा प्रकार कर्मफल सिध्दांताचा प्रभाव दिसुन येतो.

पुनर्जन्म विचार

भारतिय धर्मशास्त्रात पुनर्जन्मचा विचार हजारो वर्षा पासुन धर्ममान्य आहे. मनुष्याच्याशरीराचा मृत्यू होतो आणि त्याचा आत्मा हा अमर असतो असा विचार भगवद्गीतेतील एक शोल्क प्रसिध्द आहे.

"नैनं छिन्दान्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः

न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारूतः।।" (१०)

या श्लोकातशरीर मर्त्य तर आत्मा अर्तत्य आहे हे दिसून येते. धर्मशास्त्रातील हा पुनर्जन्माचा विचार राष्ट्रसंतानाही मान्य होता. आपल्या ग्रामगीता या ग्रंथात पुनर्जन्मचे समर्थन करतांना तुकडोजी महाराजानी "ग्रामगितेत".(११)केलेले आहे. येथे आपल्याला राष्ट्रसंताना मान्य असलेला पुनर्जन्माचा विचार स्पष्ट दिसतो आपल्या एका प्रवचनांत राष्ट्रसंत लोका समोर म्हणतात,"माणूस मरतो तेव्हा त्याचा जीवनप्रवाह एका महान शक्तीत विलिन होत असतो. तिथून आपल्या बर्‍यावाईट कर्मानुसार ते दुसरा जन्म मिळिवितात" (१२)येथे पुनर्जन्माचा विचार मान्य दिसतो त्याच प्रमाणे कर्मफळ नुसारच मनुष्याला हा दुसरा जन्म प्राप्त होत असतो हाही विचार मान्य झालेला दिसतो अशा प्रकारे राष्ट्रासंताना धर्मशास्त्रातील पुनर्जन्माचा विचार राष्ट्रसंतांच्या धर्म तत्वतील एक तत्व मानावे लागते.

वर्णाश्रम विचार

वर्णाश्रमाबाबत तुकडोजी महाराजांनी विचार मांडताना पारंपरिक विचारांपेक्षा हा विचार कसा वेगळा होता आणि काही लोंकानी केवळ आपल्या हिताचा विचार करून त्याला कसे वेगळे रूप दिले याचे विश्लेषण केलेले आहे. या बाबत आपले विचार मांडतांना ते स्पष्ट म्हणतात,की,कामाच्या सोयीसाठी भंगी,ब्राहृमण,क्षत्रिय,आदी वर्ण ठरले,गुण कर्मानुसात वर्णाश्रम निर्माण झाले पण त्याला आज जातीचे स्वरूप आले."((१३)येथे आपल्या लक्षात एक गोष्ट येते की वर्णाश्रम पद्वती ही गुणकर्मांवर आधारीत होती,जन्मावर आधारीत नव्हती परंतू कालौधात ही पध्दती जन्मावर आधारीत झाली परिणामी त्यात दोष निर्माण झाला,एखादया व्यक्ती मध्ये जो गुण प्रबळ असेल त्यावर आधारीत कार्य त्या व्यक्तीने करावे यासाठी ही पध्दती निर्माण झालेली होतो पण येथे स्वरूप बदलेले आणि जन्मजात कार्यच करावे हा विचार परंपरेने रूढ केलेला दिसतो या बाबत राष्ट्रसंत पुढे म्हणतात"योग्यते नुसार वर्ण बदलते आवश्यक होते. एखादा क्षत्रिय ब्राहमण होवू शकतो. भगी-व्यपारी कालांतराने व अभ्यासाने विद्वन होऊ शकतो. परंतू वर्णाश्रम पुढे जन्म व जातीवर स्थिर झाला. ही वर्णाश्रमाची अधोगती होय."(१४)अशा प्रकारचा दोष निर्माण झाल्याने वर्णाश्रम व्यवस्था सदोष ठरली हा विचार त्यांनी मांडला मुळची संकल्पणा जरी योग्य असली तरी मनुष्याने स्वतःच्या स्वार्थासाठी व सोयीसाठी ती बदलल्याने संकल्पणाच कुचकाती ठरली अशा प्रकारे आधुनिक भाषेतराष्ट्रसंतानी वर्णाश्रम विचाराचे विचेण केलेले दिसून येते.

रामराज्य विचार

रामराज्याचा विचार आदर्श राज्यव्यवस्थेशी संबधीत आहे. ज्या राज्यव्यवस्थेत कुणावरही अन्याय होत नाही. ज्या राज्यव्यवस्थेत सर्वांना न्याय प्राप्त होतो सर्वाना उपजिवीकेचे साधन उपलब्ध असते. सर्वांना सर्वच प्रकारचे हक्क दिले जातात आणि संपूर्ण जनता सुखाने नांदत असते असा विचार रामराज्य या संकल्पनेत अभिप्रेत आहे.

राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेत सुध्दा रामराज्याची संकल्पणा प्रकट होतांना दिसते. तुकडोजी महारांजाना हे रामराज्य भारतात हवे होते. या आपल्या संकल्पणे बाबत बोलतांना तुकडोजी महाराज आपल्या एका प्रवचणात म्हणतात,"मित्रहो! रामराज्याची निर्मिती म्हणजे एखादया प्रचंड इमारतीचा बांधकाता सारखी आहे. या देशात कोणी मागासलेला,कोणी उद्योगहीन आणि कोणी दारिद्रा आणि आंगठाछाप राहू नये हे जेव्हा शक्य होईल तेव्हाच सर्वाचा उदय सर्वादय होइल आणि सर्वादय म्हणजेच गांधीजींच्या कल्पणेतले रामराज्य."(१५) येथे आपल्याला रामराज्याची संकल्पणा स्पष्ट झालेली दिसून येते रामराज्याची संकल्पणा ही राजकीय सामाजिक वाटत असली तरी तिची प्रेरणा आध्यात्मिक आहे त्यामुळेच राष्ट्रसंताच्या धर्मतत्वज्ञानात या संकल्पणेचा समावेश करण्यात आलेला आहे.

तुकडोजीचे रामराज्य हे प्रयत्नांनी साध्य होणारे आहे. त्यासाठी "तुमची दृष्टी स्त्री-पुत्र इत्यादिकांतच गुतलेली आहे"(१६) ती याही पलिकडे जायला हवी असा स्पष्टइशारा महाराज देतांना दिसतात. सकल्पणा जरी सामाजीक असली तरी त्यात नियम,ब्रध्यचर्य आचारपध्दती अदृष्तपणे वावरतांना दिसते त्यामुळे हे धर्म तत्वज्ञाता प्रथम व समाल तत्वज्ञान नंतर ठरते.

उत्सवातीलतत्व विचार

धर्म उत्सवांमागे असणारे तत्व प्रवचनांमधून राष्ट्रसंतानी उलगडून दाखविलेले दिसते. वरवर दिसणारा एखादा धार्मिक असव हा मनोरंजनात्मक वाटतो. पण हे उत्सव निर्माण करण्यामागे काही तत्व होती त्यात धर्म,समाज,व्यक्ती यांना दिसत देने काही बाबींचे महत्व निर्माण करने चूकचे निराकरण करते पारंपरिक विचारांना नवे वळन ही तत्वे मागे पडली विस्मरणात गेली हे ओळखून  तुकडोजींनी आपल्या प्रवचनांमधून या तत्वांना उजाळा दिलेला दिसून येतो. धर्म उत्सवामागील तत्वे सांगतांना आपल्या एका प्रवचनांत तूकडोजी महाराज म्हणतात,"आपल्या पूर्वजांनी सामाजीक गुणांची वाढ व्हावी म्हणून उत्सव निर्माण केले आहेत."(१७)ज्या दिवशी महाराज हे प्रवचन करीत होते तो दिवस कृष्णाष्टमीचा होता. कृष्णाष्टमीचा उत्सव साजरा का केला जातो हे सांगतांना ते म्हणतात,"कंसाच्या राज्यात न्याय नव्हता ज्याची लाठी त्याची म्हैस हाच न्याय सगळी कडे लागू होता गरीबअमीर स्त्री पुरुष यांच्या मनात उद्वेग पसरला होता. अशावेळी श्रीकृष्ण जन्माला आला आणि या दिव्य पुरुषाने ही सर्व विस्करलेली घडी पुन्हा नीट बसविली"(१८)कृष्णाष्टमी उत्सव साजरा करण्यामागे असे समाजाला शांतता आणि सद्विचारांचा आदर्श प्रदान करणाÚया श्रीकृष्णाचे विस्मरण होऊ नये हा विचार होता हे येथे लक्षात येते. अशाप्रकारे प्रत्येक धर्म उत्सवा मागे एक तत्व आहे हे येथे तुकडोजी महाराजांनी स्पष्ट केलेले दिसुन येते. पारंपरिक विचारांना आधुनिक भाषेत अभिव्यक्त करण्याचे कार्य व लोंकविचारांना नवी दिशा देण्याचे काही येथे स्पष्ट होतांना दिसते.

धर्म व दांभिकता

केणतीही सामाजिक - राजकीय- धार्मिक व्यवस्था जन्माला आली की त्यात कालांतराने काही दोष आपोआपच निर्माण होतांना दिसतात. हे दोष मानव निर्मित असतात. त्यात काही अज्ञानाने निर्माण होतात तर काही स्वार्थी वृतीतून जन्माला येतात. धार्मिक क्षेत्रातील दोभिकत तुकडोजी महाराजांनी प्रत्यक्ष अनुभविली होती. ही दांभिकता कशी असते यावर काय उपाय करावे याबाबत ही त्यांनी आपले विचार मांउलेला दिसतात.

धर्मतत्वांचा विचार करतांना या दांभिकतेचाही विचार महत्वपूर्ण ठरतो. तुकडोजी महाराज या दांभिकेत बाबत आपल्या एका प्रवचनात म्हणतात,"धर्माच्या नावावर ढोंगाचा सुकळा करून मानवजात आपल्या विकास करू शकणार नाही."(१९)अशा ढोंगी साधू संता बाबत व भक्ता बाबत बोलतांना अन्य एका प्रवचनात ते म्हणतात,"खोटे बोलणारा व्यभिचारी विश्वासघात ही माणूस चांगला आहे असे सांगणारा संत कधीच निपजू शकत नाही.(२०)अशा प्रकारे राष्ट्रसंतानी धार्मिक क्षेत्रातील दांभिकता,पाखंड,असत्य आचार,यावर कठोर प्रहार केलेले दिसतात. धर्मविचारा बाबत आगृही असणारे आणि पारंपरिक धर्मविचारांचे महत्व प्रतिपादन करणात राष्ट्रसंत येथे या क्षेत्रातील दोष दाखवून देत या दोषा पासून दूर राहण्याचा इशाराही देतात. हे दोष धर्म क्षेत्रातील मार्गभ्रष्ट करणारे माणून त्यानी त्याना मानलेले दिसतात.

समारोप

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज धार्मिक क्षेत्रातील कालानुरूप भुमिका घेत विचार मांडणारे आधूनिक काळातील संत होते. त्यांच्या धर्मविचारातील तात्वीक बाजुचा विचार करतांना ही तात्वीक बाजू वेद,उपनिषद,गीता यात कथन करण्यात आलेल्या तात्वीक विचारांचा परिपाक सण उत्सवाभागील भूमिका व त्याचा असणारा मानवी जीवनाशी संबध या सर्वांचे सुलभ व प्रासादीक भाषेत विवेचण त्यांनी आपल्या प्रवचणांमधून मांडले आहे. राष्ट्रसंताची ही प्रवचणे सर्वसामाण्य माणसांसाठी होती. त्यामुळे त्यांना समजेल अशा साध्या सोप्या भाषेत त्यांनी धर्माचे खरे स्वरूप दाखवून दिले आहे. राष्ट्र संताच्या तत्वविचारांचा विशेष हा आहे की त्यानी समातन विचार भाग्य करीत कालानुरूप आधुनिक भाषेतून पारंपारिक तत्वे सर्वासमोर  ठेवली आणि त्याचे चिरंतनमुल्य सर्वांना अवगत करून दिले.

विशेष

१)राष्ट्रसंताच्या प्रवचनातील तात्वीक विचारांचे केन्द्र स्थान आत्मतत्वाशी संबधीत आहे,

२)धर्मशास्त्रीमील कर्मफलाचा सिध्दांत तुकडोजी महारांजानी मान्य केलेला आहे.

३)पुनर्जन्माच्या सिध्दांताचा विचार मान्य कारून कर्म फल हे जन्माला प्रभावित करते हा विचार त्यांनी मांडला आहे

४)धर्मशास्त्राचा आधार घेउनच आपण जीवन उन्नत करू शकतो यावर त्यांचा विश्वास आहे.

५)रामराज्याचा विचार मांडताना लोकजीवनात धर्म व नितीतत्वाचा सामावेश त्यांनी महत्वपूर्ण मानला आहे.

६)पारंपरिक वर्णाश्रमाचा विचार त्यांनी व्यवसायावर आधारीत वर्णपध्दतीच्या आधारावर मानला आहे.

७)धर्म हे जीवनाशी अभिन्न असनारे तत्व आहे भारतातील लोक व धर्म वेगळे काढता येणार नाही असा राष्ट्रसंताचा विश्वास आहे.

८)धर्म क्षेत्रात अनेक चांगली तत्वे असली तरी त्यात दांभिकताही आहे हे राष्ट्रसंत मान्य करतात.

९)सण-उत्सव साजरा करण्यामागे असणारी तत्वे विस्मरली गेल्याने धर्म विचार बाजुला पडल्याची जाणीव ते करून देतात.

१०)एकूणच मानवी जीवन व धर्ममुल्य धर्मतत्वे परस्परांशी संबधीत आहे त्या शिवाय मानव हा मानव होऊ शकत नाही हा विश्वास येथे त्यानी मांडला आहे.

संदर्भ ग्रंथ

१)लहर की बरखा - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गंरूदेव प्रकाशन,गुरकुंज आश्रम द्वितीय संस्करण - १९९९ पृ. –२

२)ग्रामगीता - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मडळ पुणे,पुनयुर्द्रण - २००३ पृ. चौदा.

३)राष्ट्रसंताची अभंग गाथा, - सयोजक-किसनलाल मुदंडा,गार्रमगीता प्रकाशन,समिती,नागपूर,प्रथमावृत्ती ऑक्टो - १९९१ पृ.१४

४)राष्ट्रसंताची प्रवचने - संपादक बाबा मोहोड,गुरूदेव प्रकाशन,गुरूकुंज आश्रम,अमरावती,चतूर्थ आवृत्ती २००३ पृ. ३३

५)तत्रैव- पृ. ३९

६)तत्रैव- पृ. ४३

७)तत्रैव- पृ. ०५

८)तत्रैव- पृ. १८

९)तत्रैव- पृ. २७

१०)भगवदगीता - गीता प्रेस गोरखपूर

११)ग्रामगीता - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मडळ पुणे,पुनयुर्द्रण –२००३

१२)राष्ट्रसंताची प्रवचने - संपादक बाबा मोहोड,गुरूदेव प्रकाशन,गुरूकुंज आश्रम,अमरावती, चतूर्थ आवृत्ती २००३,पृ. ५३

१३)तत्रैव- पृ. २८

१४)तत्रैव- पृ. २८

१५)तत्रैव- पृ. ७६

१६)तत्रैव- पृ. ७७

१७)तत्रैव- पृ. ८६

१८)तत्रैव- पृ. ८६

१९)तत्रैव- पृ. १०

२०)तत्रैव- पृ. ५९